

रहाटवडे (ता. हवेली) : येथील धनगरवस्ती रस्ता भूमिपूजनप्रसंगी जिल्हा प्रमुख काका धावडे, जिल्हा परिषद सदस्य सोमनाथ लांडगे, सरपंच अश्विनी चोरघे, काका खिरीड, खेड-शिवापूरचे सरपंच रमेश कोंडे, बुवा रहाटपे, अण्णा दिवे, धनाजी चोरघे.

# ८५ लाखांच्या कामांचे शिवगंगा खोऱ्यात भूमिपूजन

नसरापूर, ता. २१ : शिवगंगा खोऱ्यातील खेड-शिवापूर परिसरातील विविध विकासकामांचे भूमिपूजन व उद्‌घाटन शिवसेना जिल्हा प्रमुख काका धावडे यांच्या हस्ते झाले.

जिल्हा परिषदेचे सदस्य सोमनाथ लांडगे यांच्या जिल्हा परिषद निधीतून व १२ व्या वित्त आयोगातून; तसेच आमदार शरद ढमाले यांच्या निधीमधून व खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या खासदार निधीतून कामे मंजूर झाली आहेत. परिसरातील कल्याण, रहाटवडे, आर्वी व शिवापूर या गावांतील रस्ते, पूल, स्मशानभूमी शेड, सामाजिक सभागृह अशी एकूण ८५ लाखांची कामे होत आहेत. त्याचा शुभारंभ झाला व पूर्ण झालेल्या कामांचे उद्‌घाटन झाले.

या प्रसंगी काका धावडे यांच्यासमवेत जिल्हा परिषद सदस्य सोमनाथ लांडगे, शिवसेना विभाग प्रमुख काका खिरीड, संदीपतात्या कोंडे, संजय दिवे, रहाटवडेच्या सरपंच अश्विनी चोरघे, धनाजी चोरघे आदी उपस्थित होते.

या वेळी झालेल्या कार्यक्रमात बोलताना श्री. धावडे म्हणाले, "शिवसेनेचा प्रतिनिधी हा ऐंशी टक्के समाजकारण व वीस टक्के राजकारण करतो, हे सोमनाथ लांडगे यांनी दाखवून दिले आहे."

शिवसेना कार्यकर्ते राजू चोरघे, भानुदास दिवळे, दत्ता चोरघे, केशव ससाणे, विष्णु मोगरे, नाना-तात्या उपस्थित होते.

This PDF file is Created by trial version of 123 PDF Creator.
Please use purchased version to remove this message.